**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५६४/२०२० मधील नि.४ वरील आदेश**

अर्जदाराने सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार अर्जदारास दरमहा रक्कम रु.२०,०००/- अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की,**

२. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची कायदेशीर पत्नी आहे. अर्जदार हिचा विवाह दि. ८/०२/२०१९ रोजी झाला आहे. गैरअर्जदार क्र. २ ते ६ हे गैरअर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या घरी होसंगाबाद मध्यप्रदेश येथे राहण्यास गेली. साखरपुडयाचे कार्यक्रमात गैरअर्जदाराने अर्जदाराच्या वडीलांचा अपमान केला. लग्नानंतर एका आठवडयात गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराकडुन संमती पत्रावर जबरदस्तीने सही करुन घेतली. त्या संमतीपत्रामध्ये अर्जदारावर चारित्र्यावर आरोप लावण्यात आले होते. गैरअर्जदार हे अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास देउ लागले. गैरअर्जदार क्र.१ हा संशयी स्वभावाचा होता. तो अर्जदारावर कायम संशय घेत होता. गैरअर्जदार हे अर्जदाराला शेजा-यासोबत बोलु देत नव्हते. तसेच तिला घराबाहेर सोडत नव्हते. लग्नानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराचा मोबाईल काढुन घेतला. गैरअर्जदार हे अर्जदाराला सोन्याचे दागिणे तसेच आंधन आणले नाही म्हणुन टोमणे मारत असत. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराबरोबर तिचे इच्छेविरुद्ध शारिरीक संबंध ठेवत असे तसेच तो अनैसर्गिक शारिरीक संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकत असे. तिने नकार दिला तर तो तिला मारहाण करित असे. गैरअर्जदार हे अर्जदाराला तिच्या वडीलांकडुन पैसे आणण्यासाठी दबाव टाकत असे. लग्नानंतर अर्जदाराला एकदासुद्धा माहेरी जाता आले नाही. गैरअर्जदार हे अर्जदाराला तिच्या माहेरुन स्कुटर आणण्यासाठी दबाव टाकत असे. त्यामुळे तिने माहेरुन स्कुटर देखिल आणली होती. गैरअर्जदार क्र. ४ व ६ यांची अर्जदारावर वाईट नजर आहे. सदरची बाब अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ याला सांगायचा प्रयत्न केला असता त्याने तिला शिवीगाळ केली. गैरअर्जदार क्र. ७ ही अर्जदाराविरुद्ध तिथल्या

परिसरात तिच्या चारित्र्याबद्दल अफवा पसरवित होती. जेव्हा अर्जदाराच्या घरी मिटींग घेण्यात आली तेव्हा गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या आई-वडीलांना शिवीगाळ केली. तसेच गैरअर्जदार क्र. ६ व १ ने अर्जदाराच्या वडीलांवर हात उचलण्याचा प्रयत्न केला. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराला ब-याच वेळेला मारहाण केली. दिनांक १४/०८/२०२० रोजी अर्जदाराच्या वडीलांनी अर्जदाराला माहेरी नेले. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला सासरी नेण्यास नकार दिला. तसेच तो घटस्फोट मागत होता. त्याने इटारसी येथे दावा देखिल दाखल केला.

**३.** अर्जदारास उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वत:चा सांभाळ करु शकत नाही. उलटपक्षी गैरअर्जदार क्र. १ हा इटारसी येथे अभियंता म्हणुन काम करतो तसेच महिण्याला रक्कम रु. ६५,०००/- कमवितो. गैरअर्जदार क्र.३ यांना रक्कम रु. २५,०००/- पेंशन मिळते. गैरअर्जदार क्र. १ चे भाउसुध्दा नोकरी करुन पैसे कमवितात. गैरअर्जदार याने अर्जदाराचा त्याग केल्यापासुन अर्जदाराचे पालनपोषणाची जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अंतरिम पोटगीचा अर्ज केला आहे.

**४.** गैरअर्जदारांना नोटीसची तामिली होउन देखिल ते हजर झाले नाही. त्यामुळे दिनांक १२/१०/२०२१ च्या आदेशान्वये सदरचा अर्ज हा त्यांच्या म्हणण्याशिवाय चालला आहे.

**५.** अर्जदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही जाबदेणाराने तिच्या विरूध्द घरगुती हिंसाचार केला काय ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | होय. |
| २. | अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय.<br>अर्जदारास दरमहा रू. ५,०००/- |
| ३. | कोणता आदेश ? | अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |

६. अर्जदाराने अर्जाचे पृष्टयर्थ स्वत:चे शपथपत्र सादर केले आहे. तसेच तिने नि.क्र.२३ अन्वये मालमत्ता व दायित्वचे शपथ पत्र दाखल केले. तसेच अर्जदाराने स्वत:च्या लग्नाची पत्रिका, लग्नातील फोटो, तिचे आधार कार्ड, सामानाची यादी, दागिण्यांची यादी, टी.पी.नं.३०३८/१९ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत तसेच महाविद्यालयाचे ओळखपत्र इत्यादी दस्त दाखल केले आहे.

**मुद्दा क. १ व २ साठी**

७. अर्जदाराच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की यातील गैरअर्जदार याने अर्जदाराविरूध्द घरगुती हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे अर्जदारास पोटगी मिळण्याचा अधिकार आहे ही बाब सिध्द करण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

८. घरगुती हिंसाचार कायदयाप्रमाणे कलम २३ च्या अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे. शपथपत्रामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदाराने तिच्या विरूध्द केलेल्या घरगुती हिंसाचाराचे कथन केलेले आहे. यामध्ये महत्वाची गोष्ट म्हणुन गैरअर्जदार याने अर्जदारास हिला शारिरीक व मानसिक त्रास दिलेला आहे असे कथन केलेले आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या पालनपोषनाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही असेही कथन केलेले आहे.

९. अर्जदाराची अर्जामधील वरील कथने पाहता व अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द दाखल केलेले प्रकरण पाहता गैरअर्जदाराने अर्जदाराविरूध्द प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार केला ही बाब स्पष्ट होते. याठिकाणी हे नमुद करणे योग्य होईल की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह सन २०१९ साली झाला. अर्जदाराची कथने पाहता, गैरअर्जदारांनी अर्जदाराची पालनपोषण करण्याची जबाबदारी पार पाडली नसल्याचे स्पष्ट दिसुन येते. तसेच

कोणतीही स्त्री एक वर्ष संसार करून कोणत्याही कारणाशिवाय गैरअर्जदाराचा त्याग करेल असे प्रथमदर्शनी वाटत नाही.

१०. घरगुती हिंसाचार कायदयामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे व सदर व्याख्यानुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे हे सुध्दा हिंसाचार या व्याख्येत बसते. सदर केस पाहता गैरअर्जदाराने अर्जदारास पालनपोषणासाठी काही रक्कम दिली असे कुठेही रेकॉर्डवरून दिसुन येत नाही. तसेच गैरअर्जदाराची अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी असताना त्याने ती जबाबदारी पार पडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार झाला ही बाब सिध्द केलेली आहे.

११. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तिने नि.क्र.२३ नुसार मालमत्ता व दायित्वचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये तिने गैरअर्जदार क्र.१ हा दरमहा रक्कम रु. ६५,०००/- उत्पन्न मिळवत असल्याचे कथन केले आहे. अर्जदाराला सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार याची आहे. सदरची जबाबदारी तो नाकारु शकत नाही. त्यामुळे गैरअर्जदार याने अर्जदारास दरमहा रक्कम रूपये ५,०००/- इतकी पोटगी या अर्जदाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे. मुद्दा क्र. ३ साठी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला दरमहा रक्कम रू. ५०००/- (रूपये पाच हजार फक्त) इतकी पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन दयावी.

२. या अर्जाचा खर्च वादाच्या अनुषंगाने आकारण्यात येईल.

दिनांक : १४/१२/२०२१

(एस.एस.गाडवे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कामठी

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file are word to word as per it's original.

Name of Stenographer : Rajesh Jaidevji Khobragade,
Stenographer Grade-III
Attached to Jt. CJJD & JMFC,
Kamptee.